ठाणे, सोमवार दि. २३ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४६ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

### अति ताणाचे बळी

सध्याचे जग धावपळीचे झाले आहे. चार पैसे कमावण्याच्या नादात किंवा काम कमी कालावधीत जास्त काम केल्यामुळे अनेक कंपन्यांमधील कर्मचारी विमनस्क अवस्थेत जगत असतात.. .......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३१° से | किमान २६° से

**बाजार**

सोने ७४,४५० | चांदी ९१,०००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मुलगा व्हॉट्स अपवर ग्रुप ॲडमिन आहे, हेच चिंतेचे कारण आहे, डॉक्टर साहेब........

**थोडक्यात घडामोडी**




### पाकिस्तानी अभिनेता फवाद खानच्या चित्रपटाला मनसेचा विरोध

मुंबई : पाकिस्तानी अभिनेता फवाद खानच्या चित्रपटाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विरोध करण्यात येत आहे. फवादचा ‘लिजेंड ऑफ मौला जट’ चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही, असा इशारा राज ठाकरेंनी दिला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी सोशल मीडियावर चित्रपटाचा विरोध केला आहे आणि ट्वीट करुन इशारा दिला आहे. राज ठाकरेंनी ट्वीटमध्ये म्हटलंय, कलेला सीमा नसतात, पण पाकच्या बाबतीत हे अमान्य आहे.

#### पाकिस्तानी अभिनेत्याच्या चित्रपटाला मनसेचा विरोध

इतर राज्यांच्या सरकारांनीही हा चित्रपट प्रदर्शित होऊ देऊ नये, असंही राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. या चित्रपटावरुन राज ठाकरेंनी चित्रपटगृहाच्या मालकांनीही इशारा दिला आहे. थिएटर मालकांनीही चित्रपट दाखवयाच्या भानगडीत पडू नये, असं राज ठाकरेंनी म्हटलंय. नवरात्रीदरम्यान मला कुठलाही संघर्ष नको, सरकारनं चित्रपट प्रदर्शित होणार नाही ते पाहावं, असंही त्यांनी म्हटलं आहे.

### नेरुळ विभागात अनधिकृत झोपड्यांवर पालिकेची कारवाई

नवी मुंबई : अनधिकृत झोपड्यांविरुद्ध नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत नेरुळ विभागात कारवाई केली. नेरूळ पूर्व येथील भगवान बाबा गार्डन, सेक्टर ९, नेरुळ ग्रीनलॅन्ड अपार्टमेंटजवळ नवी मुंबई महापालिका जल उदंचन केंद्रासमोर भर रस्त्यात पदपथावर अनधिकृत झोपड्या वसवण्यात आल्या होत्या. त्या झोपडपट्ट्यांमधून अवैध व्यवसाय सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. या ठिकाणी रात्री २० ते २५ लोक पदपथावरच झोपत असल्यामुळे सर्वसामान्य महिलांना वाट काढणे कठीण झाले होते. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांना सदर रहिवाशांचा त्रास सहन करावा लागत होता याबाबत विभागातील नागरिकांनीही तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे अतिक्रमण विभागामार्फत या ठिकाणच्या अनधिकृत झोपड्या हटविण्याची कारवाई करण्यात आली असून सामान जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या सामानामध्ये पाच बॅग, सहा पाण्याचे जार, कपडे भरलेले बोचके, दगडी चुली, आठ (पान २ वर)

# चेन्नई कसोटीत भारताचा शानदार विजय

## बांगलादेशचा उडवला धुव्वा | आर अश्विनचा डबल धमाका

चेन्नई:-भारत आणि बांगलादेश यांच्यातील २ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियानं बांगलादेशचा २८० धावांनी दारूण पराभव केला आहे . भारतानं बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचं लक्ष्य दिलं होतं. प्रत्युत्तरात, बांगलादेशचा संघ चौथ्या दिवसाच्या पहिल्या सत्रातच २३४ धावांवर ऑलआऊट झाला.

भारताच्या विजयाचा हिरो आर. अश्विननं दुसऱ्या डावात सहा विकेट्स घेतल्या. या सामन्यात अश्विननं शतकही झळकावलं. तिसऱ्या दिवशी उपाहारानंतर टीम इंडियानं ४ बाद २८७ धावा करून आपला दुसरा डाव घोषित केला होता. भारतानं पहिल्या डावात ३७६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ पहिल्या डावात १४९ धावांत ऑलआऊट झाला होता. अशा प्रकारे भारताला पहिल्या डावात २२७ धावांची आघाडी मिळाली होती. लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशची सुरुवात चांगली झाली होती. सलामीवीर फलंदाज शादमान इस्लाम आणि झाकीर हसन यांनी पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहनं ही भागीदारी तोडली.

त्यानं झाकीरला यशस्वी जयस्वालच्या हाती झेलबाद केलं. झाकीरनं ३३ धावा केल्या. त्यानंतर ऑफस्पिनर आर. अश्विननं शादमान इस्लामला पायचीत करत बांगलादेशला दुसरा धक्का दिला. शादमाननं बाद होण्यापूर्वी ३५ धावा केल्या. यानंतर अश्विननं मोमिनुल हकच्या रुपात भारताला तिसरं यश (पान २ वर)

### बॅटिंगपाठोपाठ बॉलिंगमध्येही केली कमाल



मेहदी हसन मिराझला बाद करून रविचंद्रन अश्विनने पाच विकेट्स पूर्ण केल्याबद्दल आनंद साजरा केला.




ऋषभ पंतचे शतक

### दुसऱ्या डावात ऋषभ पंत, शुभमन गिलचा धमाका

बांगलादेशविरुद्धच्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात १२४ चेंडूत ऋषभ पंतने आपले शतक पूर्ण केले. तर १२८ चेंडूत १०९ धावा करत ऋषभ पंत बाद झाला. ऋषभ पंतने शतक झळकवल्यानंतर त्याच्यासह संपूर्ण मैदान भावूक झाल्याचं दिसून आले. मैदानात उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांपासून रोहित शर्मा, विराट कोहली आणि ड्रेसिंग रुममधील सर्व खेळाडूंनी उभे राहत ऋषभ पंतचे कौतुक केले. ऋषभ पंतने या खेळीत १३ चौकार आणि ४ षटकार टोलावले. ऋषभ पंत शतक झळकवून बाद झाल्यानंतर शुभमन गिलने देखील शतक केले. शुभमन गिल सध्या १६२ चेंडूत १०१ धावा केल्यानंतर खेळत आहे. शुभमन गिलने या खेळीत ९ चौकार आणि ३ षटकार लगावले.





बौद्ध धर्मातील अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या वर्षावासनिमित्त आज माझ्या ‘वर्षा’ निवासस्थानी बौद्ध भिख्खूना खास आमंत्रित करण्यात आले होते. यानिमित्ताने वर्षा बंगल्यावर भगवान बुद्ध आणि बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून त्रिशरण पंचशील प्रार्थना करण्यात आली. तसेच यानंतर या बौद्ध भिख्खूना चिवरदान, धम्मदान आणि अन्नदान करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे, शिवसेना सह मुख्य प्रवक्ते राजू वाघमारे, शिवसेना प्रवक्त्या सौ. ज्योती वाघमारे तसेच एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, अभिजित गायकवाड तसेच बौद्ध भिख्खू महासंघाचे राज्यभरातून आलेले सर्व बौद्ध भिख्खू आवर्जून उपस्थित होते.

# प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांचा अध्यादेश काही दिवसांत काढणार -मुख्यमंत्री

**नवी मुंबई – सिडको प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी घरांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्याच्या अध्यादेशावर माझी सही झाली असून काही दिवसांत अध्यादेश जारी होईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. २२) केली. ते ऐरोली येथे साकारण्यात येत असलेल्या कोळी भवनाच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते.**

व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेतील भाजपचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर, खासदार नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, कोळी महसंघांचे नेते आमदार रमेश पाटील, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, माजी आमदार संदीप नाईक, कोळी महासंघाचे नेते ॲड. चेतन पाटील, शिवसेना नेते विजय चौगुले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांच्या घरांची आजूबाजूची जागासुद्धा नियमित होईल. जे शुल्क घेणार आहोत तेदेखील आम्ही कमी केले आहे. बेस रेटच्या कमी पैसे कमी घेणार आहोत. मालकी हक्काने घरे देण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, एक दिवस रमेश पाटील माझ्याकडे आले व म्हणाले आदेश होत नाही. मी सिडको एमडींना फोन करून सांगितले ज्यांच्या जमिनींवर हे सिडको मंडळ तयार झाले त्यांना तातडीने भूखंड द्या. आम्ही राज्यात रमेश पाटील यांच्या सांगण्यावरून नुकसानभरपाई देण्याची पॉलिसी आणली. वरळी सेतू बांधताना कोळी बांधवांच्या विनंतीवरून स्पॅम वाढवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी तातडीने निर्णय घेत कोळी बांधवांना दिलासा दिला. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी इतिहासात पहिल्यांदा कोळी समाजाचा विचार केला. वेगळे खाते तयार झाले. मत्स्यसंपदा योजना आणली. वाढवण बंदरातील प्रकल्पग्रस्तांना देशातील सर्वात मोठे पॅकेज दिले जाणार आहे. आमदार गणेश नाईक यांनी रमेश पाटील यांचे कौतुक करताना नवी मुंबईतील ते पहिले उद्योगपती असून (पान २ वर)



### नवी मुंबई ऐरोली येथील कोळी भवनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमीपूजन संपन्न




### कोळी भवनाला निधी कमी पडून देणार नाही -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



कोळी बांधव हा मनमोकळ्या स्वभावाचा आहे. त्याच्या मनात एक अन् पोटात एक असं कधीचं नसतं. कोळी बांधव प्रामाणिकपणे आपला व्यवसाय करतात. कोळी भवन पुन्हा पुन्हा बांधता येत नाही, यांच्यासाठी भव्य दिव्य वास्तू उभी करा. पैशाची चिंता करण्याची आवश्यकता नाही, निधी कमी पडू देणार नाही, असे उद्गार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे काढले. राज्यात एकाच वेळी विकास आणि कल्याणकारी योजनाही सुरू आहेत. म्हणून हे शासन कमी वेळेत अत्यंत लोकप्रिय झाले आहे. हे सरकार लोकांच्या मागण्या मान्य करते, म्हणून लोक प्रश्न घेवून आमच्याकडे हक्काने येतात.शासन सर्वसामान्याच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी असते. प्रत्येक समाजाला न्याय देण्यासाठी असते. कोळी बांधवाच्या दाखल्याच्या प्रश्नासाठी एक अभ्यास गट तयार करण्यात आला आहे. काही अडचणी आम्ही दूर केल्या आहेत. उर्वरित अडचणीही दूर केल्या जातील. हे सरकार खोटं बोलून दिशाभूल करणारे नाही. जे होणार आहे तेच आम्ही बोलतो आणि आम्ही जे बोलतो तेच करतो.

# कुणाच्यातरी ताटातलं काढून दुसऱ्याला वाढणार नाही, ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही : शंभूराज देसाई

**मुंबई : कुणाच्यातरी ताटातलं काढून दुसऱ्याला वाढायचं ही राज्य सरकारची भूमिका नाही, ओबीसींच्या आरक्षणातून कुठलंही आरक्षण काढलं जाणार नाही, त्यांच्यावर कुठलाही अन्याय होणार नाही अशी ग्वाही राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पुण्यातून आलेल्या मराठा आंदोलकांच्या शिष्टमंडळाची बैठक संपली. त्यानंतर शंभूराज देसाई यांनी माध्यमांशी संवाद साधला.** (पान २ वर)



### मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात चर्चा झाली

शंभूराज देसाई म्हणाले की, शिष्टमंडळाच्या लोकांनी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये प्रामुख्याने गुन्हे मागे घेणं, मुंबई, हैदराबाद आणि सातारा गॅजेट लागू करणं हे मुद्दे होते. त्यासंदर्भात मी आणि चंद्रकांतदादांनी तात्काळ त्यासंदर्भात कामाला लागावं अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही मुख्य मागणी आहे. हैदराबाद गॅजेट लागू करा, सगेसोयऱ्यांचं नोटिफिकेशन काढा या सगळ्या जरांगेंच्या मागण्याचं ड्राफ्ट नोटिफिकेशन काढण्यावर चर्चा आहे. ओबीसींच्या आरक्षणातून कुठलंही आरक्षण काढलं जाणार नाही, त्यांच्यावर कुठलाही अन्याय होणार नाही. शंभूराज देसाई म्हणाले की, शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना मराठा समाजाची आरक्षणाची मागणी पूर्ण झाली. लक्ष्मण हाके देखील आंदोलन करत आहेत. मात्र सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का लावलेला नाही. इतर समाजाच्या आरक्षणालाही धक्का लावलेला नाही. मनोज जरांगेंनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं, त्यांची तब्येतदेखील महत्त्वाची आहे.

# अंगणवाडी सेविकांचं आजपासून बेमुदत उपोषण

**मुंबई – अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधनवाढ, दरमहा पेन्शन, ग्रॅच्युईटी देण्यात यावी, याबाबतचे प्रस्ताव महिला व बालविकास विभागाने महाराष्ट्र सरकारला सादर केले आहेत. यासंबंधी महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी कृती समितीला वारंवार दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी आणि शासकीय आदेश विनाविलंब निर्गमित करावे, अशी अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. या मागणीसाठी अंगणवाडी कर्मचारी सभेचे राज्य पदाधिकारी नितीन पवार यांच्यासह कृती समितीचे प्रमुख नेते उद्या (दि.२३) सोमवारपासून मुंबई येथील आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण सुरू करणार आहेत. त्याच्या समर्थनार्थ पुणे येथे जिल्हाधिकारी कचेरी तर पिंपरी चिंचवड येथे अप्पर तहसीलदार कार्यालय येथे आज सोमवार (दि.२३ रोजी) मोर्चे,निदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे.**

लवकरच निवडणूक आचारसंहिता सुरु होणार असल्यामुळे, शासकीय निर्णय निघतील की नाही, याबाबतीत त्या चिंताग्रस्त आहेत.यासंदर्भात अलीकडे कृति समितीच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्याची १.९.२०२४ रोजी, ठाणे भेट घेतली होती. (पान २ वर)



### दोन दिवसात प्रश्न न सुटल्यास दोन लाख अंगणवाडी सेविका स्वतःला अटक करून घेणार

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीतर्फे आंदोलन केल्यानंतर २३ व २४ सप्टेंबरपर्यंत प्रश्न न सुटल्यास राज्यातील एक लाख अंगणवाड्या बंद करून बुधवार २५ सप्टेंबर रोजी दोन लाख अंगणवाडी सेविका मदतनीस आझाद मैदान येथे स्वतःला अटक करून घेणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री (अर्थ),उपमुख्यमंत्री (गृह), मंत्री, महिला बाल विकास यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंबंधी शासकीय निर्णय लवकर काढू, अशी वारंवार व ठिकठिकाणी आश्वासने दिली आहेत, परंतु,अद्याप शासकीय आदेश निघालेले नाहीत. त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष व प्रक्षोभ निर्माण झाला आहे.

# शिवसेना अन् राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरण मंगळवारी ‘सर्वोच्च’ सुनावणी

मुंबई: महाराष्ट्रात दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. प्रत्येकी दोन-दोन पक्ष निर्माण झाले. त्यानंतर निवडणूक आयोगाने आव महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या गटाला पक्ष म्हणून मान्यता दिली आहे आणि पक्षाचे चिन्ह देखील दिले. यानंतर हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले आहे. ठाकरे गटाने आणि एकनाथ शिंदे आणि शरद पवार गटाने अजित पवार गटाविरुद्ध कोर्टात धाव घेतली आहे. आता शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे.


येत्या मंगळवारी(ता.२४) सुप्रीम कोर्टात शिवसेना आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी होणार आहे. हे प्रकरण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठापुढे आहे. लवकरच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे निवृत्त होणार आहेत. त्याआधी या प्रकरणाचा निकाल ते देणार का? याकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. तर सुनावणी होत असल्याने आमदारांच्या मनातील धाकधूक वाढली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या आमदारांचे अपात्रता प्रकरण सुप्रीम कोर्टात सुरू आहे. त्या प्रकरणावर येत्या मंगळवारी सुनावणी होणार आहे. मंगळवारी या प्रकरणाचा क्रमांक खूप दूर असल्याने त्या दिवशी सुनावणी होणार की, नवीन तारीख मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सारखया तारखा पडत होत्या. याआधी १८ सप्टेंबर ही तारीख देण्यात आली होती. त्यानंतर २२ ऑक्टोबर ही तारीख देण्यात आली होती. मात्र सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड ८ नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. तसेच महाराष्ट्रात विधानसभा (पान २ वर)



निकाल येणार की नवी तारीख मिळणार?

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## तिरुपतीच्या प्रसादवरून राजकारण ?

आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूच्या प्रसादात प्राण्यांचा चरबीचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आल्याने भविकांतून संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्यावर टीका केली जात आहे. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी जगनमोहन रेड्डी यांना लक्ष्य केले आहे. तिरुपतीचा प्रसाद असलेल्या लाडूवरून आंध्रमध्ये राजकारण तापल्याचे दिसत आहे. दरम्यान, या प्रकरणी जगनमोहन रेड्डी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे त्यांची भूमिका मांडली आणि चंद्राबाबू नायडू खोटा प्रचार करत असल्याची तक्रार केली आहे. चंद्राबाबू राजकारण करत असून तिरुमला तिरुपती देवस्थान बोर्डाची प्रतिमा कलंकित करत असल्याचा आरोपही जगमोहन रेड्डीनी केला आहे. राजकीयदृष्ट्या प्रेरित होऊन चंद्राबाबू नायडू बेपर्वा विधान करत आहेत. यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत. तसेच, तिरुमला तिरुपती देवस्थान बोर्डाचे पावित्र्यही कलंकित केले जात आहे, असा आरोप जगनमोहन रेड्डी यांनी केला आहे. जगमोहन रेड्डी यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भगवान व्यंकटेश्वराचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात कोट्यवधी हिंदू भक्त आहेत. ही नाजूक परिस्थिती काळजीपूर्वक हाताळली नाही, तर या खोट्या गोष्टींमुळे व्यापक वेदना निर्माण होऊ शकतात. विविध आघाड्यांवर दूरगामी परिणाम होऊ शकतात, अशी भीतीही रेड्डी यांनी व्यक्त केली. राजकीयदृष्ट्या प्रेरित होऊन चंद्राबाबू नायडू बेपर्वा विधान करत आहेत. यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत. तसेच, तिरुमला तिरुपती देवस्थान बोर्डाचे पावित्र्यही कलंकित केले जात आहे, असे मत रेड्डी यांनी व्यक्त केले आहे. तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूच्या प्रसादात प्राण्यांचा चरबीचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. देशभरातील भाविकांमध्ये यामुळे संतापाची लाट आहे. या लाटेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रकार आंध्रमधील सत्ताधारी पक्ष घेत आवळ्याची चर्चा होत आहे. याप्रकरणी माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्यावर टीका केली जात आहे, ते योग्य नाही. काही महिन्यांत सदर राज्यात विधानसभा निवडणूक येत आहे. या पार्श्वभूमीवर राजकारण सुरू असल्याचे दिसते. भगवान व्यंकटेश्वराचे भारतातच नव्हे तर जगभरात कोट्यवधी हिंदू भक्त आहेत. ही नाजूक परिस्थिती काळजीपूर्वक हाताळली नाही, तर या खोट्या गोष्टींमुळे व्यापक अडचणी निर्माण होऊ शकतात. विविध आघाड्यांवर दूरगामी परिणाम होऊ शकतात, अशी भीतीही रेड्डी यांनी व्यक्त केली आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीनिमित्त आंध्रमध्ये मतांचे ध्रुवीकरण करण्याचा डाव या प्रकरणात दिसत आहे. तिरुमला तिरुपती देवस्थान बोर्ड म्हणजे टीटीडी एक स्वतंत्र मंडळ आहे. यामध्ये विविध पार्श्वभूमीतील प्रतिष्ठित भक्त, केंद्रीय मंत्री, इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी शिफारस केलेल्या इतरांचा समावेश आहे. तसेच, भाजपाशी संलग्न सदस्यही या बोर्डावर आहेत. टीटीडीच्या प्रशासनावर देखरेख ठेवण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाकडे आहे आणि आंध्र प्रदेश राज्य सरकारची यात फारशी भूमिका नाही, अशी माहितीही रेड्डी यांनी दिली आहे. या प्रकरणी सत्य समोर आणून भक्तांचा विश्वास पुन्हा मिळवण्याचे आवाहनही रेड्डी यांनी केले आहे. तिरुमला तिरुपती मंदिरात येणाऱ्या तुपाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी व्यापक तपासणी केली जात आहे. कठोर ई–निविदा प्रक्रिया, मान्यताप्राप्त प्रयोगशाळा चाचण्या आणि कोणत्याही सामग्रीचा वापर करण्यापूर्वी बहु–स्तरीय तपासण्या केल्या जातात. तेलुगू देसम पक्षाच्या राजवटीच्या मागील कार्यकाळातही अशाच प्रकारचे उपाय केले गेले होते. यापूर्वी तुपाचा दर्जा निकृष्ट असल्याचे आढळून आल्याने टँकर नाकारण्यात आल्याची अनेक उदाहरणे घडली आहेत. देशातील सर्वात श्रीमंत देवस्थान म्हणून तिरुपती बालाजी मंदिराची ओळख आहे. बालाजीच्या दर्शनासाठी कोट्यवधी भाविक मंदिरात दाखल होत असतात. या ठिकाणी भाविकांना दर्शनानंतर प्रसाद म्हणून एक मोठा लाडू देण्यात येतो. या प्रसादाच्या लाडूमध्ये बीफ म्हणजे चरबी आणि माशांचे तेल वापरण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तिरूपती मंदिरातील लाडूमध्ये चरबी मिळाल्याची पुष्टी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाकडून करण्यात आली आहे. जगमोहन रेड्डींच्या काळात तिरूपती देवस्थानाच्या प्रसादाच्या लाडूमध्ये तुपाऐवजी चरबीचा वापर करण्यात आला असा आरोप आहे. या चंद्राबाबू नायडूंच्या दाव्यामुळे आंध्रप्रदेशात मोठा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणी केंद्र सरकारने सोयीनुसार चौकशी न करता पारदर्शकपणे चौकशी करण्याची अपेक्षा आहे.

## चेन्नई कसोटीत भारताचा शानदार विजय

**(पान १ वरून)** मिळवून दिलं. मोमिनुल (१३) बाद झाला तेव्हा बांगलादेशची धावसंख्या तीन गड्यांच्या मोबदल्यात १२४ धावा होती. यानंतर अश्विननं विकेटची झडी लावली. त्यानं मुशफिकुर रहीमला (१३) केएल राहुलकडे झेलबाद केलं. अश्विननं रहिमला कसोटी क्रिकेटमध्ये पाचव्यांदा बाद केलं आहे. रहीम बाद झाल्यानंतर कर्णधार नजमुल हुसेन शांतोनं आपलं अर्धशतक पूर्ण केलं. सामन्याच्या चौथ्या दिवशी नजमुल आणि शाकिब अल हसननं डाव पुढे नेला. दिवसाच्या पहिल्या सत्राच्या सुरुवातीच्या तासात दोन्ही खेळाडूंनी संयमी फलंदाजी करत भारताला विकेट घेऊ दिली नाही.

मात्र, दुसऱ्या तासात शाकिबला अश्विननं यशस्वी जयस्वालच्या हाती झेलबाद केल्यानंतर भारतीय संघानं जोरदार पुनरागमन केले. शाकीब (२५) आणि नजमुल यांच्यात पाचव्या विकेटसाठी ४८ धावांची भागीदारी झाली. भारतीय संघाला लवकरच सहावं यश मिळालं, जेव्हा लिटन दास (१) बचावात्मक शॉट खेळण्याचा प्रयत्न करताना रोहित शर्माच्या हाती झेलबाद झाला. यानंतर अश्विननं मेहदी हसन मिराजला बाद करून डावातील आपली पाचवी विकेट घेतली. जडेजाच्या गोलंदाजीत मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात नजमुल हुसैन बुमराहच्या हाती झेलबाद झाला. त्यानं १२७ चेंडूत ८२ धावा केल्या, ज्यात ८ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश आहे. यानंतर अश्विनची जादू कायम राहिली आणि त्यानं तस्किन अहमदलाही (५) बाद केलं. हसन महमूदला बाद करून जडेजानं शेवटची विकेट घेतली.

## प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी घरांचा अध्यादेश काही दिवसांत काढणार –मुख्यमंत्री

**(पान १ वरून)** त्यांनी समाजासाठी वाहून घेतले असल्याचे म्हटले. आमदार रमेश पाटील यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र तातडीने मिळावे तसेच प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्यांचे उरलेले भूखंड मिळावेत, अशी मागणी केली. यासह वाढवण बंदरातील मच्छीमारांचे संभ्रम दूर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मुंबईतील ४२ कोळीवाड्यांचे सीमांकन झाले सांगून त्यांचे कौतुक केले. कोळी भवनासाठीही त्यांच्यामुळे भूखंड मिळाल्याचे ते म्हणाले.

आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघात दोन हजार कोटी निधी आणू शकले, स्मार्ट व्हिलेज करू शकले, प्रकल्पग्रस्त मच्छीमारांना नुकसानभरपाई देऊ शकले, असे सांगून मी तुमची लाडकी बहीण आहे. आशीर्वाद रहावा, असे म्हटले. त्यावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दोघांनी हसून प्रतिसाद दिला. मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही दोन भाऊ तुमच्यासोबत आहोत. तुम्ही काळजी करू नका. कार्यक्रमास कोळी बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना अन् राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरण मंगळवारी 'सर्वोच्च' सुनावणी

**(पान १ वरून)** निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. त्याआधीच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आमदार अपात्रता प्रकरणावर ऐतिहासिक निकाल देणार का? याकडे देशाचे लक्ष लागले आहे. चंद्रचूड यांच्यात काळामध्ये अनेक ऐतिहासिक निकाल आले आहेत. मात्र आमदार अपात्रता प्रकरण हे अत्यंत गुंतागुंतीचे असल्याने यावर काय निकाल येणार हे पाहावे लागणार आहे. राज्यातील सत्ता संघर्षाप्रमाणेच, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या चिन्ह आणि पक्ष या प्रकरणावरील सुनावणी देखील प्रलंबित आहे. वारंवार सुनावणी लांबणीवर पडत असल्याने विरोधकांकडून यावर टीका देखील करण्यात येत आहे.

## अंगणवाडी सेविकांचं आजपासून बेमुदत उपोषण

**(पान १ वरून)** त्यात कबूल केल्याप्रमाणे यानंतर वीस दिवस उलटूनही अधिकारी वर्गासह याविषयी अद्याप मिटिंग झाली नाही. यापूर्वीही अनेक वेळा बैठका घेऊन, चर्चा करण्याचे शासनाने मान्य केल्यामुळे त्यावर विश्वास ठेवून कृति समितीने ठरलेली आंदोलने स्थगित केली आहेत. परंतु, प्रदीर्घकाळ आश्वासनाची पुर्तता न झाल्यामुळे अंगणवाडी कर्मचारी व कृति समितीच्या नेत्यांमध्ये नाराजी व चिंतेची भावना निर्माण झाली आहे. म्हणून याबाबत निर्णय करून घेण्यासाठी कृति समितीने नेते दि.२३.९.२०२४ पासून आझाद मैदान मुंबई येथे बेमुदत उपोषण करत आहेत. तर २५.९.२०२४ रोजी, राज्यभर अंगणवाड्यांचा बंद ठेवून आझाद मैदानावर तीव्र निदर्शने व जेलभरो आंदोलन होणार आहे. शासनाने कृति समितीच्या नेत्यांशी विचारविनिमय करून मानधनवाढ, दरमहा पेन्शन व ग्रॅच्युईटी या संदर्भातील शासकीय आदेश विनाविलंब निर्गमित करावे, ही या आंदोलनाची मागणी आहे, असे नितीन पवार, यांनी कळवले आहे.

## कुणाच्यातरी ताटातलं काढून दुसऱ्याला वाढणार नाही, ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही : शंभूराज देसाई

**(पान १ वरून)** मराठा समाजाच्या शिष्टमंडळाची मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत बैठक झाली. मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात या बेठकीत चर्चा करण्यात आली. मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्या, मुंबई, हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करा अशा मागण्या मराठा समाजाच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्र्यांसमोर केल्या. मराठा समाजाच्या मागण्यांवर उद्यापासून अधिक गतीनं काम सुरु करा अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येणार आहेत अशी प्रतिक्रिया शंभूराज देसाईंनी दिली.

## नेरुळ विभागात अनधिकृत झोपड्यांवर पालिकेची कारवाई

**(पान १ वरून)** ताडपत्री, ७ दोरखंड, दोन प्लायवूड टेबल, दोन सोफे, दोन बेड, तीन टेबल, सहा मोठे प्लायवूड, ३ लहान प्लायवूड, पाच बॅनर, छत्तीस बांबू, एक हिरवी जाळी, चार प्लास्टिक खुर्च्या असे सामान जप्त करून कोपरखैरणे क्षेपणभूमी येथे जमा करण्यात आले आहे. ही कारवाई अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचारी, बारा मजूर, दोन पिकअप, एक डंपर, नेरुळ स्थानिक पोलीस पथका समवेत सुरक्षारक्षक यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

## नोकरीच्या अमिषापोटी फसवणूक करीत बँक खाते काढून ३८० कोटीच्या व्यवहाराचा गोलमाल

**आर्थिक गुन्हे शाखेत प्रकरण नोंद**

**ठाणे – नोकरीचे आमिष दाखवून दिवा पूर्व भागात रहाणाऱ्या प्रमोद गोपाळ पानगले (३८) याच्या कडून विविध दस्तावेज घेऊन त्याद्वारे कोटक बँक आणि ए.यु.फायनान्स बँक ठाणे, शाखा कासारवडवली येथे खाती उघडली. या दोन्ही बँकेचे चेक सही करून घेत. बँकेत अनोळखी मोबाईल नंबर नोंद केला. दिपक शुक्ला, राहूल पटवा, चेतन खाडे यांनी बँकेत फिर्यादी प्रमोद** पानगल याच्या नकळत ३८० कोटींचा व्यवहार केल्याचे समोर आले. सदर प्रकरणी प्रमोद पानगल यांनी आर्थिक फसवणुक प्रकरणी ठाणे शहर आर्थिक गून्हे शाखेकडे अर्ज केला. अखेर आर्थिक गुन्हे शाखा ठाणे शहरचे पोलीस निरीक्षक सतिषचंद्र राठोड यांनी मी केलेला तक्रारी वरून तिघांवर ३८० कोटींचा बेकायदेशीर व्यवहार केल्याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

फिर्यादी प्रमोद गोपाळ पानगले(३८) रा. ओम साई चाळ रूम नं–०९ गणेष नगर, आगासान दिवा, जि ठाणे दिवा परिसरात ईस्टेट एजंट व्यवसाय करीत होते. फिर्यदीच्या परिचयाचे चेतन खाडे, रा. डोंबिवली याने मोबाईलवर संपर्क साधून महिन्याला २० हजाराचा पगार मिळेल असे आमिष दाखविले. खाडे याने मालाड येथे राहणाऱ्या राहुल पटवा याच्याशी ओळख करून दिली. दोघांनी फिर्यादीचे आधारकार्ड, पॅनकार्ड, फोटो व माझ्या जुन्या बँक खात्याचा एक सही केलेला बँकेचा चेक सोबत आणायला सांगून काळबादेवी मुंबई येथे बोलावले. तेथे दिपक शुक्ला यांच्याशी भेट करून दिली. दिपक शुक्ला यांच्या कार्यालयात फिर्यादीत यांचे बँक खाते उघडण्यासाठी बँकेचे प्रतिनिधी आले. त्यांनी माझी ओळखपत्रे घेऊन फोटो काढले आणि माझा व्हिडिओ बनवला. कोटक बँक खात्यावर पगार येईल असे सांगून चार दिवसांनी दिपक शुक्ला, चेतन खाडे आणि राहुल पटवा हें मला दिवा येथे भेटण्यास माझ्या घरी आले तेथून त्यांनी फिर्यदीला काळबादेवी मुंबई येथील दिपक शुक्ला यांच्या कार्यालयात घेऊन गेले, त्यावेळी दिपक शुक्ला व राहूल पटवा यांनी मला नोकरी साठी लागणारे काही कागदपत्रे दाखवली व त्यावर फिर्यादी याची सही घेतली, त्याचवेळी कोटक बँकेच्या ५ चेक्सवर सहया घेतल्या व नोकरी करीता दहा– बारा दिवसांनी परत यावं लागेल असं सांगून मला घरी जाण्यास सांगितले. कोटक बँकेचे खाते तांत्रिक कारणास्तव रद्द झाले. पुन्हा कागदपत्र आणि सह्या घेऊन ए.यु.फायनान्स बँक ठाणे येथे खाते उघडले. या दोन्ही बँकेत रजिस्टर नं हा भलताच टाकण्यात आला. तर बँकेचे आलेले मेसेज कडे लक्ष देऊ नका असेही फिर्यदिला सांगितले. दोन्ही बँकेत त्रिकुटाने वेगळे मोबाईल देऊन ओटीपी आणि इतर कामासाठी वापर केला. तर तिघांनी संगनमत करीत दोन्ही बँकेत फिर्यादी यांच्या नावे असलेल्या बँकेत प्रमोद कार्पोरेषन शॉप नं–१७, दुसरा मजला, धन भवन, जुने हनुमान फस्ट एक्स लेन, एमजे, मुंबई ४०० ०४२ या प्रोप्रायटरशीप फर्मच्या नावे कोटक बैंक येथे बँक खाते उघडण्यात आले. संपर्कासाठी फिर्यादी च्या नावाचा बनावट मेल तयार करून दोन्ही बँकेतून तब्बल ३८३ कोटी ८३ लाख ६३ हजाराचा व्यवहार केला. याबाबत फिर्यादी पानगल यांना कुठल्याच प्रकारची कल्पना नव्हती कारण तिन्ही आरोपी हे मोबाईल ओटीपी आणि मेलद्वारे बँक व्यवहार परस्पर करीत होती मोठ्या रकमेची आवक जावक झाल्याने ठाणे शहर आर्थिक गुन्हे शाखेच्या विभागाने फिर्यादी प्रमोद पानगल यांना विचारणा केली असता त्यांनी नोंदविलेल्या जबाबांमध्ये सदरचे प्रकरण समोर आले.

ठाणे शहर आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने जबाब नोंदविल्यानंतर फिर्यादी पानगल यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात आरोपी दिपक शुक्ला, चेतन खाडे आणि राहुल पटवा यांच्या विरोधात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा शनिवारी २१ सप्टेंबर रोजी दाखल केला

## ठाण्याच्या शौर्या अंबुरे हिने ॲथलेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले

ठाणे – महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स स्पर्धा यावर्षी पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे दि. १९ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आल्या. या वर्षीच्या क्रीडा स्पर्धेत ठाण्याच्या शौर्या अंबुरे हिने क्रीडाप्रेमींचं विशेष लक्ष वेधून घेतलं . शौर्या हिने १६ वर्षाखालील मुलींच्या ६० मी धावणे या शर्यतीमध्ये ७.५८ सेकंदाचा नवीन विक्रम नोंदवून सुवर्णपदक पटकावले . यापूर्वीचा राज्य विक्रम ७.९५ सेकंद असून राष्ट्रीय विक्रम ७.७७ सेकंद इतका आहे.

तसेच ८०मी अडथळा शर्यतीत सुद्धा शौर्या हिने ११.४७ सेकंदाचा नवा राज्य विक्रम नोंदवून सुवर्णपदक पटकावले. यापूर्वीचा राज्य विक्रम ११.७६ सेकंद आहे व राष्ट्रीय विक्रम ११.५ सेकंद इतका आहे.

ठाण्याच्या शौर्याने एकापाठोपाठ एक असे दोन विक्रम नोंदवल्याने सर्व क्रीडाजगतामध्ये तिचे कौतुक होत आहे. शौर्या ही ठाण्याच्या universal hiसह शाळेची विद्यार्थिनी असून ती ज्येष्ठ क्रिडा प्रशिक्षक अजित कुलकर्णी सरांकडून त्यांच्या Aim Sports and Fitness अकॅडमी मध्ये गेली ८ वर्ष प्रशिक्षण घेत आहे. प्रशिक्षक अजित कुलकर्णी सरांनी आतापर्यंत अनेक जागतिक स्तरावरचे खेळाडू घडवले आहेत व त्यांच्या Aim Sports foundation च्या माध्यमातून ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा उपक्रम राबवत असतात.




### विवाहितेचा दीड महिन्यानंतर छळ सुरू

## भरोसा सेलमध्ये तक्रार.. पती,सासू,सासरा आणि नंदे विरोधात गुन्हा दाखल

ठाणे – स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुंबई कार्यालयात नोकरीस असलेल्या विवाहिता सायली रोहन नाईक (३३) हीचा विवाह एप्रिल,२०२१ रोजी विवाहानंतर लोन फेडण्यासाठी माहेरून ५ लाख आणण्यास नकार दिल्याने शारीरिक, मानसिक छळ सुरू केला. याबाबत विवाहितेने भरोसा सेलमध्ये तक्रार केली. अखेर कळवा पोलीस ठाण्यात पती चंद्रकांत नाईक(३६), सासु ज्योती चंद्रकांत नाईक(६६), सासरे चंद्रकांत राजाराम नाईक(६९) आणि विवाहित नणंद– अमृता चंद्रकात नाईक(४०) याच्या विरोधात विवाहितेचा शारीक आणि मानसिक छळ केल्या प्रकरणी रविवारी (ता –२२ सप्टे) रोजी गुन्हा कळवा पोलीस ठाण्यात दाखल झाला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.



पीडित फिर्यादी विवाहिता सायली रोहन नाईक (३३) रा. अमोघ अपार्टमेन्ट, रूम नं. ४०४, ४ था माळा, पारसिक बँकेच्या समोर, पाखाडी, खारीगांव, कळवा एप्रिल,२०२१ रोजी रोहन चंद्रकांत नाईक(३६) नोकरी रा. साकेत काम्पलेक्स, ए–५/४०४, वीर सावरकर रोड, माजीवाडा, ठाणे याच्याशी विवाह झाला. विवाहात रोहन याला पीडितांच्या कुटुंबीयांनी
१० ग्रामच्या दोन सोन्याचे अंगठ्या,१ ग्रमच्या दोन सोन्याचे काईन, मोबाईल फोन, कपडयासाठी ३० हजार रूपये रोख दिले होते.पीडितेच्या विवाहानंतर पुण्यात राहणाऱ्या नणंद अमृता चंद्रकात नाईक हीचे नेहमीच येणे जाणे होते. विवाहाच्या अवघ्या दीड महिन्यानंतर विवाहितेचा सासू, नणंद,है टोमणे मारून शिवीगाळ करू लागले. पती आणि सासरा त्यांना सहकार्य करीत होते. जाच सहन करता करता विवाहितेला एक अपत्यही झाले. मात्र त्रास वाढू लागला. याबाबत विवाहितेने माहेर गाठले. २७ नोव्हेंबर रोजी विवाहिता सासरी आई वडिलांसोबत आली. तेव्हा भांडणे करीत पीडितेच्या वडिलांच्या अंगावर धावून जात शिविगाळी करीत हाकलून दिले. पीडितेच्या मुलीलाही सांभाळत नसल्याने विवाहिता ४ महिने माहेरी आली होती. त्यानंतर राहते घरचे लोन रोहन व ज्योती यांचे नावे असुन ते फेडण्यासाठी तु तुझ्या वडील यांचेकडुन पाच लाख रूपये घेवुन ये. याला नकार देताच विवाहितेचा छळ सुरू झाला. विवाहितेने ठाणे पोलीस आयुक्तांलयाच्या भरोसा सेल कडे तक्रार दिली. त्या आधारे कळवा पोलीस ठाण्यात विवाहितेचा छळा प्रकरणी पती, सासू, सासरा आणि नणंद यांच्या विरोधात कळवा पोलीस ठाण्यात हुंडाबळीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
पाणी पुरवठा विभाग

निविदा सूचना क्र. ११/२०२४–२५

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महागनरपालिका क्षेत्रातील ४ कामांकरीता B-1 नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई–निविदा मागवित आहे. कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तीची माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २३/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई–टेंडरीग कार्यप्रणालीद्वारे दि. ३०/०९/२०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत भरता येतील. प्रापत निविदा दि. ०१/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदासाठी बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१६८९
दि. २०/०९/२०२४

सही/–
शहर अभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

नवी मुंबई महानगरपालिका
शहर अभियंता विभाग
निविदा सुचना क्रमांक-नमुंमपा/ शहर अभियंता / 140 /2024-25
कामाचे नाव :- ऐरोली विभागातील नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.
अंदाजित रक्कम रु. :- 25,28,510/-
निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.23/09/2024 रोजी प्राप्त होतील. फेर-निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचेआहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संर्पक करावे.
कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(शिरीष आरदवाड)
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/417/2024

## एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल

■ पद क्र.
कॉन्स्टेबल/फायर (पुरुष)
■ शैक्षणिक पात्रता: १२वी(विज्ञान) उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता: उंची: १७० सेमी, छाती: ८०-८५ सेमी
■ वयाची अट: ३० सप्टेंबर २०२४ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²:फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४ (११:०० झच्)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.cisf.gov.in

सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

### सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती साजरी

# कर्मवीर भाऊरावांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे अखंड कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर करताहेत : शरद पवार






सातारा : कर्तृत्व, दातृत्व, सामाजिक बांधिलकी असलेले आणि समाजकारणाला महत्व देत सामाजिक दायित्व पार पाडणारे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीयांनी विद्यमान शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेला ७ कोटी ११ लाख रुपयांची देणगी दिली आहे, त्याबद्दल त्यांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते आज (दि. २२) कर्मवीर जयंतीनिमित्त समारंभपूर्वक हृद्य गौरव करण्यात आला.बहुजनांच्या शिक्षणाचे वटवृक्ष रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पदमभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७ वा जयंती सोहळा सातारा येथे कर्मवीर भूमीत अनेक मान्यवर व हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत पार पडला.

थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला आहे. आजपर्यंत १०० कोटीहून अधिक रुपयांची देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे अखंड कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर करत आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विधायक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमी मुक्तहस्ते मदत केली आहे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या विद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे. विद्यमान शैक्षणिक वर्षात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २ कोटी ६५ लाख रुपये, त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी ३ कोटी ९१ लाख रुपये तर सुपुत्र परेश ठाकूर यांनी ५५ लाख रुपयांची देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे, त्याबद्दल त्यांचा यावेळी संस्थेच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.तसेच सात्रल विद्यालयाच्या विकासासाठी ५० लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शाखेच्या वतीनेही सत्कार करण्यात आला.

चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे आणि याच सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबिय कार्य करीत असतात. रयत आणि ठाकूर कुटुंबियांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे, यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम रयत सेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत करीत आहेत. स्वतः ची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था हि शैक्षणिक संस्था असतानाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जीवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले आहे. रयत शिक्षण संस्था मातृसंस्था माणून सदैव रयतेच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण देशात आदर्श घालून दिला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वतःला झोकून दिले. त्यामुळे संस्थेच्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा कायम राहिला आहे. त्यामुळे संस्थेचे आधारस्तंभ असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबाचा सन्मान करून त्यांच्याप्रती आभार व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ.अनिल पाटील, व्हाइस चेअरमन भगीरथ शिंदे, सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू - पाटील, सचिव विकास देशमुख, आमदार बाळसाहेब पाटील, आमदार शशिकांत शिंदे, आमदार सुमन पाटील, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, वैशाली देशमुख, जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, शुभांगी घरत, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के, यांच्यासह मॅनेजिंग कौन्सिल व जनरल बॉडी सदस्य, रयत सेवक उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी रयत सेवकांना मार्गदर्शन केले. तसेच संस्थेच्या कार्याचा आणि पुढील वाटचालीचा आढावा मांडला.

### पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रसारित करीत

# स्वच्छता सायक्लॉथॉनमध्ये ५०० हून अधिक सायकलपटूंचा सहभाग




नवी मुंबई : स्वच्छतेप्रमाणेच पर्यावरणहिताय उपक्रमांवरही 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भर देण्यात येत असून 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानांतर्गत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज आयोजित करण्यात आलेली 'स्वच्छता सायक्लोथॉन' ५०० हून अधिक सायकलपटूंच्या सहभागाने यशस्वीरित्या संपन्न झाली. विशेष म्हणजे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी स्वत: सायकल चालवित या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश प्रसारित केला. नमुंमपा मुख्यालयाच्या आयकॉनिक इमारतीपासून सुरू झालेली ही स्वच्छता सायक्लोथॉन मुख्यालयासमोरील सर्व्हिस रोडवरून पामबीच मार्गाने टीएसचाणक्य चौकापर्यंत गेली व तिथून वळून पुन्हा पामबीच रस्त्याने मुख्यालयासमोर सायक्लोथॉनची सांगता झाली.

या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश प्रसारित करण्यात आला तसेच सायकलसारख्या इंधनविरहित वाहनाचा वापर वाढवून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचे तसेच स्वआरोग्य जपणुकीचे महत्वही प्रसारित करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, माजी आमदार संदीप नाईक, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व डॉ.संतोष वारूळे, सहा. आयुक्त डॉ.अमोल पालवे वशशिकांत तांडेल, कार्यकारी अभियंता राजेश पवार व इतर मान्यवर आणि सायकलपटू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लेट्स सेलिब्रेट फिटनेस आणि द लर्नयार्ड या संस्थांच्या सहयोगाने आयोजित या सायक्लोथॉनव्दारे स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश प्रसारित करण्यासोबतच सायकल सारखे वाहन चालवून प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी असाही संदेश देण्यात आला.

'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत सोमवार, दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ७ वा. महापालिका क्षेत्रातील रेल्वे स्टेशन्सची सखोल स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली असून मंगळवार, दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती अर्थात एपीएमसीच्या सर्व मार्केट्समध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी याप्रसंगी उपस्थित राहून सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वच्छता ही सेवा अंतर्गत इंटरनॅशनल कोस्टल क्लीनअप दिवस निमित्ताने

# मेगा बीच क्लीन ड्राईव्ह संपन्न

भाईंदर : राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी दिनांक २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त पूर्वतयारी म्हणून स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी स्वच्छता ही सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे तसेच यावर्षी स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता ही अभियान राबविण्यात येतो. या अभियानाचा एक भाग म्हणून स्वच्छता ही सेवा अंतर्गत इंटरनॅशनल कोस्टल क्लीनअप दिवस निमित्ताने दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता उत्तन बीच आणि वेलकंनी बीच येथे मेगा बीच क्लीन ड्राईव्ह हा उपक्रम राबविणे बाबत मिरा भाईंदर




महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी निर्देश दिले होते. सदर मनपा कर्मचारी, छत्रज्ञ व शहरातील नागरिकांनी मिळून स्वच्छता ही सेवा यासाठी श्रमदान केले तसेच स्वच्छता ही सेवा या कार्यक्रम पार पाडण्यासाठी विविध अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी उकृष्टरित्या पार पाडल्या आहेत.

मिरा भाईंदर महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी या उपक्रमाविषयी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले मिरा भाईंदर शहरातल्या नागरिकांमध्ये स्वच्छतेची जनजागृती व्हावी शहरे आणि समुद्र किनार प्लास्टिक कचरा मुक्त व्हावा यासाठी हे मेगा बीच क्लीनअपचे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर उपायुक्त संजय दोंदे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सिस्टीम मॅनेजर तथा जनसंपर्क अधिकारी राज घरत, सहाय्यक आयुक्त जितेंद्र कांबळे, सहाय्यक आयुक्त प्रियांका भोसले यांच्यासह मिरा भाईंदर महानगर पालिकेचे अधिकारी आणि सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिसऱ्या, चौथ्या मार्गिकेवरुन एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांची वाहतुक सुरु

ठाणे : मध्य रेल्वे प्रशासनाने ठाणे ते दिवा पाचवी आणि सहावी मार्गिका एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करून दिली असली तरीही अनेक एक्स्प्रेसगाड्या या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकांवरून धावत आहे. या रेल्वे रुळांलगत असलेल्या रहिवाशांच्या एक्स्प्रेसगाड्यांच्या आवाजामुळे कानठळ्या बसू लागल्या आहेत. वृद्ध, रुग्ण या प्रकारामुळे त्रस्त झाले असून यातून केव्हा सुटका मिळेल अशी विचारणा करू लागले आहेत. उपनगरीय रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर ही त्याचा परिणाम होत असल्याचे प्रवासी संघटनांचे म्हणणे आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी येथील रहिवाशांनी वारंवार मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला. परंतु त्यांना सकारात्मक परिणाम दिसून येत नाही असे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे

मध्य रेल्वे प्रशासनाने ठाणे ते दिवा रेल्वे स्थानका दरम्यान दोन मार्गिकांचे लोकार्पण फेब्रुवारी २०२२ मध्ये करण्यात आले होते. त्यानंतर यातील नव्याने तयार करण्यात आलेल्या मार्गिकांवरून धिम्या उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक होते. पूर्वीच्या अस्तित्त्वात असलेल्या रेल्वे मार्गिकांवरून जलद उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक होते. तर, पारसिक बोगद्यातील मार्गिका पाचवी आणि सहावी मार्गिका ओळखली जात आहे. पाचव्या आणि सहाव्या मार्गिका या मालगाड्या आणि एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्रपणे उपलब्ध असतील असा दावा मध्य रेल्वे प्रशासनाकडून केला जात होता.

परंतु पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसह तिसऱ्या- चौथ्या मार्गिकांवरूनही एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांची वाहतुक होत आहे. त्यामुळे उपनगरीय रेल्वे वाहतुकीवर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीमुळे जलद उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक खोळंबते असे प्रवाशांचे म्हणणे आहे. तर, खारेगाव, कळवा, पारसिक भागात मोठ्याप्रमाणात लोकवस्ती आहे. येथील रहिवासी आता या एक्स्प्रेस गाड्यांच्या वाहतुकीने हैराण झाले आहेत. एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांच्या कानठळ्या बसविणाऱ्या आवाजामुळे येथील वृद्धांना आणि रुग्णांना अधिक त्रास सहन करावा लागतो. रात्रीच्या वेळेतही एक्स्प्रेसगाड्यांची वाहतुक होत असते. त्यामुळे आवाजाची पातळी वाढते असे रहिवाशांचे म्हणणे आहे. मध्य रेल्वे प्रशासनाला विचारले असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

*पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या निर्माणासाठी आम्ही २०११ पासून वारंवार पाठपुरावा केला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले होते की, उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक आणि एक्स्प्रेस गाड्यांच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध होतील. परंतु अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर धोरणात देखील बदल होत असल्याचे दिसून येते. एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांची वाहतुक तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेवरून सुरूच आहे. पाचवी-सहावी मार्गिका निर्माण झाली तरीही अपघातांचे प्रमाण कमी झाले नाही. त्यामुळे सध्यातरी या मार्गिकेचा उपयोग झालेला नसल्याचे दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला जाब विचारणे आवश्यक आहे.*

*-लता अरगडे, अध्यक्ष, उपनगरीय रेल्वे प्रवासी संघ.*






महाराष्ट्र देशाच्या प्रगतीचे इंजिन तर एमएमआर महाराष्ट्राचे

मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे..!

# आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं..! मुख्यमंत्री

ठाणे (गणेश भोईटे): महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होऊ शकेल इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्र हे देशाच्या प्रगतीचे इंजिन आहे. तर आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं, असे उद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे काढले. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत ठाणे विकास परिषद-२०२४ चे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

## अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न साकार करावयाचे असेल तर नीती आयोगाच्या अहवालातील सूचनांप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याबाबतीत मित्रा संस्थेने पुढाकार घेवून त्याप्रमाणे दिशा देण्याचे काम केले आहे. ठाणे जिल्हयाची ४८ बिलियन डॉलर अर्थव्यवस्था आहे, सन २०३० पर्यंत ती १५० बिलियन डॉलर होणे हे आपले उद्दिष्ट आहे. ठाण्याचा जीडीपी ७.५ टक्के आहे, हा जीडीपी २० टक्क्यांवर आणण्याचा प्रयत्न करायचा आहे. ठाण्यामध्ये विविध लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातूनच खड्डेमुक्त रस्ते, सेंट्रल पार्क, ब्लू सी, एसटीपी प्लँट, प्रदूषणमुक्त पाणी यासारखे विविध उपक्रम सुरु आहेत, असे सांगून ते म्हणाले की, विकास आणि कल्याणकारी योजना राबविणारे तसेच राज्याच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

यावेळी व्यासपीठावर राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक, मित्रा चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजू जैस्वाल मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, मित्रा चे सह मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील खोडवेकर व अमन मित्तल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पर्यटन विभागाचे संचालक बी.एन.पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त प्रदीप चंद्रन, एमएमआरडीचे विक्रमकुमार, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदूराणी जाखड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे आयुक्त अजय वैद्य, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिल पवार, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ आदी मान्यवरांची उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आपण मुंबई महानगर प्रदेशात पाच सेक्टर्समध्ये जर धोरणात्मक काम केले तर आपली अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची क्षमता या मुंबई महानगर प्रदेशात आहे. यामुळे सर्वांना उद्योग, सर्वांना रोजगार, सर्वांना घरे, हरित ठाणे अशा सर्व गोष्टी साध्य करु शकतो. ठाण्यामध्ये काही गोष्टी सुरु होतात, मग नंतर त्या इतर सर्व ठिकाणी सुरु होतात, असा हा ठाण्याचा इतिहास आहे. महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होईल, इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे.

## रिअल इस्टेट जास्त रोजगार देणारे क्षेत्र

*शेतीनंतर रिअल इस्टेट जास्त रोजगार देणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्र आता जीडीपी मध्ये, परदेशी गुंतवणूकीत, पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात अशा विविध क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहे. देशाची जी एकूण गुंतवणूक आहे,त्यापैकी ५२ टक्के ही एकट्या महाराष्ट्राची आहे. अटल सेतू मुळे आपण आता मुंबई ते नवी मुंबई हा प्रवास फक्त २० मिनिटात करू शकतो. या प्रकल्पाबाबत आधी फ्लेमिंगो पक्षी नाहीसे होतील अशी टीका करण्यात आली. मात्र पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांनी प्रत्यक्षात फ्लेमिंगोंची संख्या दुप्पट झाल्याचा अहवाल दिला आहे. अटल सेतू हा मार्ग एक गेम चेंजर प्रकल्प ठरला आहे. समृध्दी महामार्गामुळे ८ तासात आपल्याला नागपूरला पोहोचता येते. लवकरच ठाणे ते बोरिवली प्रवास आपण २० मिनिटात करू शकणार आहोत. ईस्टर्न फ्री वेचा विस्तार करण्यात येत आहे. विरार-अलिबाग कॉरिडोरचे काम सुरु होत आहे. असे विविध प्रकल्प साकारताना, विकासकामे करताना जास्तीत जास्त प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जात आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण होणार आहे. पालघरला तिसरे विमानतळ तयार करीत आहोत. आपल्याकडे उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी असल्यामुळे उद्योग आपल्या राज्यात येत आहेत. दाओसला जावून १ लाख ३७ कोटींच्या करारांवर स्वाक्षरी केली आहे.*

सार्व. बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त

# अंबरनाथ शहरात विविध ठिकाणी लोकोपयोगी शिबिर



अंबरनाथ : काही माणसांचं बोलणं कमी आणि काम जास्त असतं... अनेक लोकांना, कार्यकर्त्यांना ज्यांनी उभं केलं... महाराष्ट्रासह कोकण विकासाचा धडाका लावणारे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या २० सप्टेंबर रोजी वाढदिवसाचे औचित्य साधून कोणतीही झळकाऊ बॅनरबाजी न करता भारतीय जनता पार्टीच्या वतीने अंबरनाथ शहरात विविध ठिकाणी लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत सकाळी ८ वाजता अंबरनाथ पूर्व छत्रपती शिवाजी महाराज चौकात नाका कामगार व घरेलू कामगार नोंदणी शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांच्याहस्ते करण्यात आले.

विविध कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थ्यांचे फॉर्म भरून घेणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांचा सन्मान त्याचबरोबर परिचारिका व सफाई महिला कामगार महिलांना साडी भेट देऊन सन्मान करण्यात आल्याची माहिती भाजप कल्याण जिल्हा सरचिटणीस अभिजीत करंजुले पाटील यांनी दिली. भाजप प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त अंबरनाथ शहरात विविध ठिकाणी सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन भाजप कल्याण जिल्हा सरचिटणीस अभिजीत करंजुले पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

याप्रसंगी भाजप माजी नगरसेविका अनिता भोईर, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा सचिव रूपाली लठ्ठे,भाजप कल्याण जिल्हा सरचिटणीस अभिजीत करंजुले पाटील, रीना मोरे, सुरेखा शहा अंजू शहा, सुनिता अडांगळे, श्रद्धा गुंजाळ, ज्योती डोंगरे, पूजा रणदिवे, सुनिता लयाल,वैशाली सावंत तसेच राजेंद्र कुलकर्णी, लक्ष्मण पंत, ओंकार काळे विजय सुर्वे, विजय सिंग, दीपक कोतेकर, नवीन शहा , लक्ष्मी राजपूत, राजू गायकवाड, साईनाथ गुंजाळ, ईश्वर गुंजाळ, लालमन यादव आदी भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या वतीने गौरा गणेशोत्सवानिमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्ये विराजमान झाली आहे. या मार्केटच्या राजाचे पूजन आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. २१) करण्यात आले. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस.के. नाईक, गौरा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक, सचिव दिलीप अनभुले उपस्थित होते.*



*स्वच्छता ही सेवा पंधरवड्यात स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने २ ऑक्टोबरपर्यंत दररोज विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आज २१ सप्टेंबर या जागतिक किनारपट्टी स्वच्छता दिनाचे औचित्य साधून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांमध्ये खारफुटी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये १६०० हून अधिक एनसीसी व स्काऊटचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, नागरिक यांच्या एकत्रित सहयोगातून महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वच ठिकाणी खाडीकिनाऱ्यांवरील खारफुटी भागातील कचरा साफ केला. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी मोहीमेच्या विविध ठिकाणी भेट देत मोहीमेत सहभाग घेतला. त्यांच्यासमवेत त्या त्या ठिकाणी उपस्थित नागरिकांनी स्वच्छता व प्लास्टिकबंदीची सामुहिक शपथ ग्रहण केली. परिमंडळ १ उपआयुक्तसोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे व डॉ.संतोष वारूळे यांनीही विविध ठिकाणी मोहीमेत सहभाग घेतला.*

काजुवाडी-वैतीनगर रहिवासी मित्र मंडळ आणि कै. बारकूशेठ वैती प्रतिष्ठान, ठाणे आयोजित

# भव्य घरगुती श्री गणेश सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर

ठाणे : ठाण्याचे माजी महापौर, मा. नगरसेवक अशोक बारकू वैती, शिवसेना, ठाणे शहर प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली काजुवाडी - वैतीनगर रहिवासी मित्रमंडळ आणि कै. बारकूशेठ वैती प्रतिष्ठान, ठाणे यांच्या संयुक्त माध्यमातून गेले ३४ वर्ष सातत्याने विभागातील नागरिकांसाठी यशस्वीपणे घरगुती श्री गणेश सजावट स्पर्धा आयोजित करण्यात येते. यंदा सदर स्पर्धेचे ३५ वे वर्ष असून सदर घरगुती श्री गणेश सजावट स्पर्धा २०२४ चा निकाल जाहीर करण्यात येत आहे. प्रथम क्रमांकास रू. ५,५५५, द्वितीय क्रमांकास रू. ३,३३३, तृतिय क्रमांकास रू. २,२२२ तसेच उत्तेजनार्थ अनेक बक्षीसे, त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट आकर्षक मुर्ती करिता प्रथम क्रमांकास रू. १,१११ व उत्तेजनार्थ रू. ५५५ बक्षीस जाहीर केले आहे. अशोक बारकू वैती साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिक्षक म्हणून सुहास काकडे, पांडुरंग दाभेकर, कमलाकर खोपडे, प्रतिक जाधव यांनी मोलाचे सहकार्य दिले




| क्रमांक | साकारलेली कलाकृती | स्पर्धकांचे नाव | विभाग |
|---|---|---|---|
| प्रथम क्र. | टाकाऊ पासून टिकाऊ अशा पुठ्ठ्यापासून आकर्षक काल्पनिक मंदिराची सजावट | विजय भोळे | संत निरंकारी चौक, काजूवाडी |
| द्वितीय क्र. | जेजुरी मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली होती अतिशय कोरीव व सुबक काम | प्रतीक पालेकर | जिजामाता नगर |
| तृतीय क्र. | काल्पनिक दगडांचे मंदिर | नेहा खुळपे | श्रद्धा आनंद सो. |
| चतुर्थ क्र. | राजस्थानी मंदिराचा देखावा | रामचंद्र शिंदे | साईनाथ नगर |
| पाचवा क्र. | काल्पनिक मंदिर | अद्वेत जाधव | काजूवाडी |
| **सर्वोत्कृष्ठ मूर्ती पारितोषिक** | | | |
| प्रथम क्र. | हाताने बनविलेली सुबक व आकर्षक मूर्ती | गौरव आंग्रे | साई ओम बी. २ |
| उत्तेजनार्थ | केदारनाथ मंदिर आकर्षक सजावट व आकर्षक रूपातील मूर्ती | बबन नाचरे | काजूवाडी |
| **उत्तेजनार्थ विजयी स्पर्धक** | | | |
| उत्तेजनार्थ | गोल्डन टेम्पल प्रतिकृती | प्रसाद गायकवाड | काजूवाडी |
| उत्तेजनार्थ | टाकाऊ पानांपासून टिकाऊ डिझाईन | रोहित बोंदे | वैभव लक्ष्मी सो. |
| उत्तेजनार्थ | जगन्नाथ पुरी मंदिर देखावा | गौतमी भोसले | साईनाथ नगर |
| उत्तेजनार्थ | द्वारका मंदिर | मयुरी दिलीप वाणी | साईनाथ नगर |
| उत्तेजनार्थ | नैसर्गिक देखावा व सजावट | विनोद कदम | साईनाथ नगर |
| उत्तेजनार्थ | विठ्ठल सजावट | निखिल आमने | जिजामाता नगर |
| उत्तेजनार्थ | स्त्री शक्ती चलचित्र | सुदर्शन भोईर | जिजामाता नगर |
| उत्तेजनार्थ | पंढरपूर वारी देखावा | एस.बी. देवरे | देव अशोका |


विजय भोळे


प्रतीक पालेकर



नेहा खुळपे


रामचंद्र शिंदे


अद्वैत जाधव



गौरव आंग्रे


बबन नाचरे


प्रसाद गायकवाड


रोहित बोंदे


गौतमी भोसले


मयुरी वाणी


विनोद कदम


निखिल आमने


सुदर्शन भोईर


एस. बी.देवरे

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771